ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - VIII | Issue - I | Marathi Part - I | January - March - 2019

**Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal**

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

**IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com**

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

Scanned by CamScanner

# CONTENTS OF MARATHI PART - I



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| २७ | महानुभाव पंथाच्या आचार धर्मातील तत्वज्ञान<br>**प्रा. सिध्दार्थ कुंडलिक इंगोले** | १३३-१३५ |
| २८ | मराठा साम्राज्य : व्यापार आणि वाणिज्य, शासन आणि प्रशासन आणि आंतरराष्ट्रीय संबंध<br>**डॉ. मधुकर रामचंद्र साठे** | १३६-१४२ |
| २९ | मराठीतील बखर वाङ्मय<br>**प्रा. संदीप परदेशी** | १४३-१४५ |
| ३० | मराठा मुक्ती मोर्चा : एक जन आंदोलन<br>**प्रा. मायकर आर. बी.** | १४६-१४९ |
| ३१ | मराठा सत्तेचा ऱ्हास : शिवधोरणाचा त्याग एक कारण<br>**डॉ. प्रा. रामभाऊ मुटकुळे**<br>**प्रा. पावडे खोब्राजी वामनराव** | १५०-१५५ |
| ३२ | मराठा साम्राज्यातील जातीव्यवस्था आणि बलुतेदारी पध्दती<br>**डॉ. एन. जी. सुर्यवंशी**<br>**प्रा. गणेश लोढे** | १५६-१६३ |
| ३३ | मराठा साम्राज्य : वारकरी संप्रदाय आणि साहित्य<br>**प्रा. पाटील वंदना सांडुराव** | १६४-१६६ |





Scanned by CamScanner

# २९. मराठीतील बखर वाङ्मय

**प्रा. संदीप परदेशी**
सहायक प्राध्यापक, पदवी व पदव्युत्तर मराठी विभाग, बलभीम महाविद्यालय, बीड.

प्रस्तावना

मराठीतील प्राचीन व मध्ययुगीन वाङ्मय हे पद्यातच होते. परंतु१७व्या व१८व्या शतकात बखर वाङ्मयाच्या रूपाने मराठीत गद्यवाङ्मयाची सुरूवात झालेली आपणास दिसून येते. बखर हा एक गद्य साहित्याचा प्रकार यादृष्टीने पाहिले तर त्यामधील विविधता व सौंदर्य आपल्याला सहजासहजी दिसून येईल. बखरवाङ्मयाचा याठिकाणी आपल्याला एक वाङ्मयप्रकार म्हणून विचार करावयाचा आहे.

बखर म्हणजे वार्ता किंवा समाचार किंवा वृत्त या अरबी शब्दाचा अपभ्रंश होऊन बखर या शब्दाची उत्पत्ती झाली आहे. बखर या शब्दाचा अर्थ राजकीय स्वरूपाचे ऐतिहासिक लेखन करण्याकडे कल दिसून येतो. या देशातील लोकजीवनावर मुसलमानी आक्रमक भारतात आल्यानंतर त्यांच्या अनेक पद्धतींचा व परंपरांचा परिणाम झाला. मुसलमानांच्या तवारिखा पाहिल्यानंतर मराठ्यांनासुद्धा बखरी लिहिण्याची इच्छा निर्माण झाली. मराठा साम्राज्यात बखरी लिहिण्याची जी पद्धत सुरू झाली ती इंग्रज कालखंडातसुद्धा टिकून राहिली.

**बखरींचे स्वरूप**

बखरलेखनामागे विविध प्रकारच्या प्रेरणा होत्या तसेच कालपरत्वे तिच्यात बदल होत गेला. सुरूवातीला शुरविरांची चरित्रे सांगणे व त्यांचा पराक्रम वर्णन करणे हा जरी हेतू असला तरी नंतर त्यात फरक पडत गेला. बखरींचे स्वरूप पाहिले असता असे दिसते की तिची सुरूवात इतिहास म्हणून झाली असली तरी हे स्वरूप नंतरच्या काळात राहिले नाही. काही बखरी जुनी कागदपत्रे पाहून जरी लिहिलेल्या असल्या तरी त्यात सजविण्याचा प्रकार दिसून येतो. बखरींमध्ये कालविपर्यास, अतिशयोक्ती व पाल्हाळ हे दोष दिसतात. चरित्रनायकाची खुशामत करणे हा एक हेतू दिसून येतो.

इतिहास म्हणून तिचे महत्व कमी झाल्यावर त्यात लालित्याचे गुण आले. बखर लिहिणार्यांचा असा एक वर्ग निर्माण झाल्याने लेखनात साहित्यिक गुण उतरले व त्यामुळे हा प्रकार साहित्याला जास्त जवळचा वाटू लागला.

**बखरींचे प्रकार**

१. **चरित्रात्मक** - या प्रकारच्या बखरींमध्ये एखाद्या व्यक्तीचे चरित्र समग्रपणे दिलेले असते. उदा.सभासदकृत शिवछत्रपतीचे चरित्र.



Scanned by CamScanner

२. **आत्मचरित्रात्मक** - यात एखादी अधिकारी व्यक्ती स्वतःच्या जीवनातील महत्वाचे प्रसंग स्वतःच्या भाषेत सांगत असते. उदा. नाना फडणीसाचे आत्मचरित्र

३. **युद्धवर्णनात्मक** - यात एखादी व्यक्ती एखाद्या युद्धाचा प्रसंग स्वतःही ठेवून बखर लिहित असते. उदा. पानिपतची बखर.

४. **सांप्रदायिक** - यामध्ये एखाद्या माहिती देण्यासाठी बखर लिहिलेली असते. उदा. हनुमंतस्वामीची बखर.

५. **वंशवर्णनात्मक** - या प्रकारात एखाद्या वंशाचा इतिहास सांगितलेला असतो. उदा. पेशव्यांची बखर, होळकरांची बखर.

६. **प्रसंगवर्णनात्मक** - यात एखाद्या प्रसंगाचे वर्णन केलेले असते. उदा. ब्रम्हेंद्रस्वामींच्या निधनाची बखर.

**मराठीतील काही महत्वाच्या बखरी**

१. **महिकावतीची बखर** - महाराष्ट्रधर्माचे स्वरूप सांगणारी ही पहिली बखर आहे. तसेच सर्वात जुनी बखर म्हणुनही या बखरीकडे पाहिले जाते. यात शके १०६० पासून महिकावतीच्या राज्यातील सर्व कुलांची माहिती दिली आहे. ही एक सलग बखर नसून अनेक गद्य व पद्य प्रकरणे यात आहे. हकीगती, लढायांची वर्णने व वंशावळीही या बखरीत आहे.

२. **सभासद बखर** - स्वराज्याच्या काळातील एक महत्वाची बखर म्हणून या बखरीला मानतात. कृष्णाजी अनंत सभासद यांनी राजारामाच्या आज्ञेने जिंजी या ठिकाणी या बखरीचे लेखन केले. या बखरीमुळेच मराठीतील चरित्रात्मक बखरींचा आदर्श निर्माण झाला. सहजसुंदर व अर्थपुर्ण वाक्य हे या बखरीचे वैशिष्ट्य आहे. बखरकार हे चरित्रनायकाच्या समकालीन असल्यामुळे लष्कर, पागा, शिलेदार, कारखाने व किल्ले यांचा तपशील देतो.

३. **चित्रगुप्ताची बखर** - रघुनाथ यादवयांनी १७६० ते १७७० याकालखंडात ही बखर लिहिली. यांनी काही ठिकाणी सभासद बखरीचा अनुवाद केला आहे. या बखरीत जिजाबाई व सईबाई या दोघीही शिवाजी महाराजांना अवतार मानतात असे सांगीतल्यामूळे या लिखाणात अस्वाभाविकता आल्याचे दिसते.

४. **श्रीशिवछत्रपतींचे सप्तप्रकरणात्मक चरित्र** - मल्हार रामराव चिटणीस यांनी ही बखर १८१० साली लिहिली. सभासद बखरीने जे आदर्श घालून दिले होते तेच आदर्श या बखरीत दिसतात. यात शिवाजी महाराजांच्या पराक्रमांचे वर्णन केलेले आहे. या बखरीत सात प्रकरणे आहेत- १) पूर्वजन्मवर्णन व जन्मकथन,२) राज्यआक्रमण व सज्जनसेवा, ३) अफजलखान वध, ४)राज्यमर्यादास्थापना व पितृदर्शन, ५) दिल्लीपती पराभव, ६) दक्षिणदिग्विजय,७) राज्याभिषेक.चिटणीस यांनी या बखरीबरोबरच संभाजी महाराज, राजाराम, शाहू, रामराजा, धाकटे शाहू महाराज यांच्याही बखरी लिहिल्या आहेत.

५. **नाना फडणिसाचे आत्मचरित्र** - मराठी बखर वाङ्मयामध्ये आत्मचरित्रात्मक बखर हा प्रकार अल्प प्रमाणात दिसतो. नानांनी हे आत्मचरित्र आत्मनिरीक्षणाच्या हेतूने लिहिले आहे. आपल्या चरित्रात नानाने अतिशय प्रामाणिकपणे गुण,



Scanned by CamScanner

अवगुण, सद्विचार, असद्विचार,अनिवारपणाइ.गर्व लिहिले आहे. म्हणजेच आत्मचरित्र लिहिण्याला लागणारी निःस्पृह वृत्ती नानाच्या ठिकाणी दिसते.

६. **पानिपतची बखर** - रघुनाथ यादव यांनी पानिपतच्या युद्धानंतर गोपिकाबाईच्या सांगण्यावरून ही बखर लिहिली. या बखरीत पौराणिक प्रसंग दिले आहेत.पानिपतच्या युद्धात उतरलेले सरदार त्याला भीम-अर्जुनासारखे वाटतात.बखरकाराने यात मराठ्यांचे शौर्य, धारिष्ट्य, दृढनिश्चय, राजनिष्ठा इ.गुण सांगितले आहे.

७. **भाऊसाहेबाची बखर** - कृष्णाजी शामराव यांनी या बखरीतून पानिपतच्या युद्धाची सविस्तर माहिती दिली आहे. यात व्यक्ती व प्रसंगांचे वर्णन मनोहर आहे. बखरीची भाषा प्रासादिक आहे. उपमा, दृष्टांत, सुभाषिते, म्हणी यांचा योग्य उपयोग केला आहे.

**सारांश**

विषय व लिहिण्याची पद्धत यांमुळे बखरीला एक स्वतंत्र वाङ्मयप्रकाराचे स्थान प्राप्त झाले आहे. बखर ही शक्यतो कोणाच्या तरी आज्ञेवरून लिहिली असल्यामुळे ती मुद्दाम सजविण्याची शक्यता असते. भावनापूर्ण लेखन हा बखरीचा आत्मा असतो. त्यावेळी भाषा ही व्यक्ती आणि प्रसंग यांना अनुरूप, जिवंत, रसरसित, अलंकारिक, म्हणी व सुभाषितांनी युक्त अशी असते तेव्हा बखरीचे महत्व व दर्जा याबाबत संदेह राहत नाही.

बखरीची भाषा ही रसरसीत व मनोहर अशी असते म्हणजेच बखरवाङ्मय हे मराठी भाषेतील एक अतिशय श्रेष्ठ दर्जाचे असे वाङ्मय आहे.

**संदर्भ ग्रंथ**

१. मराठेकालिन संस्था व विचार- गायकवाड, सरदेसाई.

२. प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास- ह.श्री. शेणोलीकर

३. मराठी वाङ्मयाचा इतिहास- संपा.रा.श्री. जोग

४. मराठी भाषा: उद्गम आणि विकास- कृ.पा.कुलकर्णी



Scanned by CamScanner